| | | | |
|---|---|---|---|
| **सी.एन.आर. क्र.–** | दाखल तारीख | – | ११/११/२०२४ |
| **एम.एच.एन.एस.–२०००–२१७०–२०२४** | नोंदणी तारीख | – | ११/११/२०२४ |
| | निकाल तारीख | – | १३/०५/२०२६ |
| | कालावधी | – | **०१** वर्ष **०६** महिने **०२** दिवस |

# सिन्नर येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, यांचे न्यायालयात
## ता. सिन्नर, जि. नाशिक
## ( पिठासीन अधिकारी लक्ष्मीकांत चं. वाडीकर )

**नियमित फौजदारी खटला क्र. ४४०/२०२४** **निशाणी क्र. ५६**

..........................................................................................

प्रथम खबरी अहवालाचा तपशील –
गुन्हा रजि. क्र. – ३१२/२०२४, दिनांक १२/०४/२०२४
पोलीस ठाणे – सिन्नर.

..........................................................................................

महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस अधिकारी,
पोलीस ठाणे **सिन्नर**,
ता. सिन्नर, जि. नाशिक **.... अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. **रामाराम गणेशराम चौधरी,**
वय २९ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. शिवाजीनगर एकलव्य शाळेजवळ,
जळगाव रोड जामनेर, जि. जळगांव,

**२. सुजाराम चौधरी,**
वय ३९ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. मांगल, ता. समदरी, जि. बाडमेर, राजस्थान,

**३. नरेश कुमार गमनाराम चौधरी,**
वय २७ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. थ्री हॉल जयश्री, ता. समदरी, जि. बाडमेर, राजस्थान,

**४. दिनेश चौधरी,**
वय ३६ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. टिकमपुरा, सिकोर, बाडमेर, राजस्थान,

**५. कमलेश चौधरी,**
वय २६ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. टिकमपुरा, सिकोर, बाडमेर, राजस्थान,

**६. सिरोज चौधरी,**
वय ३९ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. टिकमपुरा, ललना, बाडमेर, राजस्थान,

**७. मांगीदेवी उर्फ मंजुदेवी ओमाराम चौधरी,**
वय ३२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. हुबळी, कर्नाटक,

**९. कानाराम चौधरी,**
वय ५९ वर्ष, व्यवसाय – शेती,
रा. हुबळी, कर्नाटक,

**१०. अंधाराम चौधरी,**
वय ४३ वर्ष, व्यवसाय – शेती,
रा. मागटन, बाडमेर, राजस्थान. **.... आरोपी**

**आरोप – भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये**

..........................................................................................

सरकारी वकील श्री. जे. एस. पाटील ..... अभियोग पक्षातर्फे

वकील श्री. पी. एम. रायजादे ..... आरोपींतर्फे

..........................................................................................

**भाग 'ब'**

**फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परिच्छेद ४४ (ii)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | जानेवारी २०२३ ते दि. १०/०९/२०२३ रोजी पावेतो वेळोवेळी |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | १२/०४/२०२४ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ११/११/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | १७/०३/२०२६ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | २३/०३/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयास ठेवल्याची तारीख | १३/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | १३/०५/२०२६ |
| प्रकरणात काही शिक्षा झाल्याची तारीख | – |

## आरोपीचा तपशिल

| अनु क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | दोषी ठरविले की, निर्दोष मुक्त केले | शिक्षा झाली असल्यास, तपशिल | संपरिक्षे दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामाराम गणेशराम चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| २. | सुजाराम चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ३. | नरेश कुमार गमनाराम चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ४. | दिनेश चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ५. | कमलेश चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ६. | सिरोज चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| ७. | मांगीदेवी | – | – | भारतीय दंड विधान कलम | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उर्फ मंजुदेवी ओमाराम चौधरी | | | ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | मुक्त केले | | |
| ९. | कानाराम चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |
| १०. | अंधाराम चौधरी | – | – | भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | – | – |

**परिशिष्ट I**

**भाग 'क'**

**फौजदारी नियमावलीचा प्रकरण VI चा परिच्छेद ४४ (iii)**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | मिनाक्षी रामाराम चौधरी – निशाणी क्र. ३९ | फिर्यादी |
| सा.क्र. २ | सुनिता भिकाजी बाणाईत – निशाणी क्र. ४२ | साक्षीदार |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ४० | फिर्यादी जबाबावरील सही |
| २. | निशाणी क्र. ४१ | प्रथम खबरी अहवालावरील सही |

## बचाव पक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

| अ. क्र. | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमालाचे वर्णन | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

# न्यायनिर्णय

## (अधिघोषित दिनांक १३/०५/२०२६)

प्रस्तुत आरोपी यांचे विरूध्द भारतीय दंड विधान, १८६० (संक्षिप्तमध्ये यापुढे 'भादंवि') चे कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असणा–या गुन्ह्यासाठी संपरिक्षा घेण्यात

आली.

२. अभियोग पक्षाच्या खटल्याचा थोडक्यात सारांश असा की, घटना फिर्यादीचे राहते घरी व त्यानंतर नंदुरबार, राजस्थान व फिर्यादीचे सासरी सिन्नर येथे जानेवारी २०२३ ते दि. १०/०९/२०२३ पावेतो वेळोवेळी घडली होती. आरोपी क्र. ०१ हस फिर्यादीचा पती असुन त्यांनी प्रेमविवाह केला तो फिर्यादीचे सासरकडचे नातेवाईक यांना मान्य नव्हता. आरोपी फिर्यादीस फोनद्वारे म्हणायचे की, तुम्ही आमच्या समाजाची नाहीस, तु आमचे घरातुन निघुन जा अशी कुरापत काढुन फिर्यादी शिवीगाळ करत केली व तिचा शारीरिक छळ केला.

३. सदर घटनेबाबत फिर्यादी नामे मिनाक्षी राजाराम चौधरी यांनी सिन्नर पोलिस ठाणे येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादीन्वये सिन्नर पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदणी क्र. ३१२/२०२४ दाखल झाला. एम.बी.महीरे, पो.हवालदार/३६७, सिन्नर पोलिस ठाणे यांनी गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. संपुर्ण तपास झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोप पत्र क्र. २०५/२०२४ दाखल केले.

४. सर्व आरोपी प्रस्तुत खटल्याचे कामी हजर झाल्यानंतर मी आरोपींविरुध्द निशाणी क्र. २६ अन्वये भादंविचे कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असणा–या गुन्ह्याचा दोषारोप निश्चित केला. दोषारोपातील सर्व मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. सदर आरोपींनी निशाणी क्र. २७ ते ३५ अन्वये सदरचा गुन्हा नाकबूल केला. आरोपी विरोधात पुरावा दिसुन न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदविण्यात येणारा जबाब घेण्यात आला नाही.

५. अभियोगपक्षातर्फे श्री. जे. एस. पाटील सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे श्री. पी. एम. रायजादे अभियोक्ता यांचा युक्तिवाद ऐकला.

६. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वरील बाबींचा विचार करता खालील मुद्दे माझे विचाराधीन आले आहेत. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष मी कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, फिर्यादीचे राहते घरी व त्यानंतर नंदुरबार, राजस्थान व फिर्यादीचे सासरी सिन्नर येथे जानेवारी २०२३ ते दि. १०/०९/२०२३ पावेतो वेळोवेळी या दरम्यान "तु आमचे समाजाची नाही, तु आमचे घरातुन निघुन जा" अशी कुरापत काढुन आरोपी फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ केला व त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ४९८(अ) सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला ? | **..... नाही.** |
| **२.** | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमूद वेळ, दिनांक व ठिकाणी आरोपींनी मिळून संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन तिचा अपमान सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा इतर गुन्हा तिचेकडून व्हावा, या उद्देशाने केला व त्याद्वारे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला ? | **..... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| **३.** | वर नमूद वेळ, दिनांक व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस धमकी दिली व त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | **..... नाही.** |
| **४.** | आदेश काय? | **..... आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

## <u>मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ करीता :–</u>

७. सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने व पुरावा एकत्रित आल्याने त्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. मिनाक्षी चौधरी (सा.क्र.१) हिने सरतपासात कथन केले आहे की, आरोपी क्र. ०१ हे तिचे पती व इतर आरोपी हे तिचे सासरचे नातेवाईक आहेत. दि.२३/०१/२०२३ रोजी विवाह गुजरात दुय्यम निबंधक कार्यालय येथे त्यांचे लग्न झाले होते. लग्नानंतर ती नंदुरबार येथे चार पाच दिवस राहिले व त्यानंतर सासरी राजस्थान येथे एकत्र कुटुंबात नांदणेस गेली होती. आरोपींसोबत फिर्यादीचे किरकोळ वाद झाले होते. त्याव्यतिरिक्त काहीही घडले नसल्याचे तिने कथन केले. साक्षीदाराने फिर्यादी जबाबावरील सही(नि.क्र.४०) व एफ.आय.आर. वरील सही(नि.क्र.४१) मान्य केली. परंतू, मजकूर तिला माहिती नसल्याचे कथन केले आहे. आरोपी तिला तु आमचे समाजाची नाहीस असे घालुन पाडुन बोलत असे व शिवीगाळ करत असे हे स्पष्टपणे नाकारले आहे.

८. सदर साक्षीदार अभियोग पक्षास विसंगत साक्ष दिल्याने

सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासामध्ये उत्तरसूचक स्वरुपातील प्रश्ने विचारले. साक्षीदारास फिर्यादीतील जबाबातील अधोरेखांकित भाग अ वरील मजकुर वाचुन दाखविला असून तो खरा व बरोबर नाही असे कथन केले आहे. पोलिसांनी तो तसा का नमुद केला याबाबतचे कारण देखील सांगु शकत नाही. तसेच, न्यायालयाबाहेर त्यांची आरोपींसोबत समझोता झाला आहे व त्यांच्यातील वाद मिटले आहे असे सांगितले. पुढे तिने आरोपींना शिक्षा होऊ नये म्हणून खोटी साक्ष दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

९. अभियोग पक्षातर्फे सुनिता बाणाईत (सा.क्र.२) हिने सरतपासात कथन केले आहे की, फिर्यादी तिची मुलगी असुन आरोपी क्र. ०१ हा तिचा पती व इतर आरोपी हे तिचे सासरकडील नातेवाईक आहेत. त्यांचे पती आजारी असुन त्यांना चालता येत नसल्याचे कथन केले. दि.२३/०१/२०२३ रोजी फिर्यादी व आरोपी क्र. ०१ चा विवाह झाला होता. लग्नानंतर ती सासरी नांदणेस गेली होती. आरोपींसोबत किरकोळ वाद झाले होते. त्याव्यतिरिक्त काहीही घडले नाही. आरोपी त्यांच्या मुलीला तु आमचे समाजाची नाहीस असे घालुन पाडुन बोलत असे व शिवीगाळ करत असे हे नाकारले आहे.

१०. सदर साक्षीदार अभियोग पक्षास विसंगत साक्ष दिल्याने सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासामध्ये उत्तरसूचक स्वरुपातील प्रश्ने विचारले. साक्षीदारास त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वरील मजकुर वाचुन दाखविला असून तो खरा व बरोबर नाही असे कथन केले आहे. पोलिसांनी तो तसा का नमुद केला याबाबतचे कारण देखील सांगु शकत नाही. तसेच, न्यायालयाबाहेर त्यांची आरोपींसोबत समझोता झाला आहे व त्यांच्यातील वाद मिटले आहे असे सांगितले. पुढे तिने आरोपींना

शिक्षा होऊ नये म्हणून खोटी साक्ष दिल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास बचावपक्षाने नाकारला आहे.

११. अभिलेखावरील आलेला एकंदरीत पुरावा पाहिला असता, साक्षीदारांनी सरतपासात आरोपींनी फिर्यादीस तु आमचे समाजाची नाहीस, तु आमचे घरातुन निघुन जा अशी कुरापत काढुन तिला शिवीगाळ, केली ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. सदर बाब दर्शविणेसाठी तिच्या तोंडी शब्दाशिवाय इतर पुरावा नसल्याचे मान्य केले आहे. पुढे तिने फिर्यादीमधील मजकूर काय नमूद केला आहे, हे माहित नसल्याचे कथन केले आहे. तिचे साक्षीतून गुन्हयाची फिर्याद सिध्द झालेली नाही. सदर साक्षीदार ही आपले कथनांवर ठाम असल्याचे दिसून येत नाही. सबब, तिची साक्ष विश्वसनीय वाटत नाही.

१२. आरोपींनी संगनमताने घटनेवेळी घटनास्थळी मिनाक्षी चौधरी (सा.क्र.१) हिचा शारिरीक व मानसिक छळ केला असल्याचा दर्शविणारा संयुक्तिक पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे गुन्ह्यातील पिडीत/फिर्यादी हिने अभियोग पक्षाशी विसंगत साक्ष दिली आहे. सबब, फिर्यादीने व साक्षीदाराने अभियोग पक्षाशी विसंगत साक्ष दिली आहे. एकंदरीत उपलब्ध पुरावा हा आरोपींनी फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ केला हे दर्शविणारा संयुक्तिक पुरावा उपलब्ध नाही.

१३. सबब, आरोपींनी भादंविचे कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा सिध्द झालेला नाही. सबब, मुद्दे क्र. ०१ ते ०३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्र. ०४ करीता :-**

१४. वरील विवेचन गृहीत धरता, सर्व आरोपी गुन्ह्यातून

निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. मिनाक्षी (सा.क्र.१) व सुनिता (सा.क्र.२) यांचे न्यायालयातील साक्षीतील कथन त्यांचे पोलिसांकडे नोंदविलेल्या जबाबाशी विसंगत आहे. त्यांनी त्यांचे साक्षीत आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने वाद मिटलेला असल्याचे कथन केले आहे. सबब, न्यायालयातील साक्षीत सदर साक्षीदारांनी तशी भुमिका घेतल्याचे दिसून येत असल्याने खोटी साक्ष दिल्याच्या गुन्ह्यासाठी त्यांचेविरुध्द कारवाई करणे, उचित वाटत नाही. सबब, मुद्दा क्र. ०४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :-

## आदेश

**१.** आरोपी नामे **१. रामाराम गणेशराम चौधरी, २. सुजाराम चौधरी, ३.नरेश कुमार गमनाराम चौधरी, ४. दिनेश चौधरी, ५. कमलेश चौधरी, ६. सिरोज चौधरी, ७. मांगीदेवी उर्फ मंजुदेवी ओमाराम चौधरी, ९. कानाराम चौधरी** व **१०. अंधाराम चौधरी** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणा-या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहितेच कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तिक व जामीनदारांचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.05.13 17:24:56 +0530

**( लक्ष्मीकांत चं. वाडीकर )**

ठिकाणी – सिन्नर. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,

दिनांक – १३/०५/२०२६. सिन्नर न्यायालय, सिन्नर.